नि.दि.दावा क्र.८८८/२०१६

निशाणी क्र.६५

**<u>वादीतर्फे सा.क्र.१ यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. गवळी यांच्यामार्फतः</u>**

माझ्या वडीलांना एक भाउ होता त्यांचे नाव शिवराम आंधळे होते. माझ्या वडीलांच्या व त्यांच्या वाटप झाल्याबाबत फेरफार नंबर मला सांगता येणार नाही. वाटपात माझ्या वडीलांना कोणता गट नंबर आले व त्यांच्या भावाला कोणते गंट नंबर आले त्यांचे नंबर मला सांगता येणार नाही.

प्रश्न– वडीलांच्या नावे वाटपात किती क्षेत्र आले?

उत्तर– टाकळी क्षेत्रात चार एकर, गणेश मातीमध्ये तीन सव्वा तीन एकर, गजदरा येथे पाच एकर क्षेत्र आले, कुंभारदा–याकडे पाच एकर क्षेत्र आले.

हे म्हणणे खरे आहे की टाकळी क्षेत्रात जी जमिन आहे ती माझ्या वडीलोपार्जित जमीन नाही. हे म्हणणे खरे नाही की जमिनी मी थोरला म्हणून माझे नावे आली. थोरला रामदास होता. रामदासच्या नावे थोरला म्हणून कोणते गट नंबर आले त्यांचे नंबर मला सांगता येणार नाही. रामदासच्या नावे कुंभारद–यातील पाच एकर क्षेत्र गजदरांची पाच एकर क्षेत्र आली. मी सांगतो जेवढी जमीन वडीलांच्या नावे होती ती सगळी जमीन रामदासच्या नावे आली. टाकळी, गणेशमाती, कुंभारदरा आणि गजदरा येथील चार जमीनी रामदासच्या नावे आल्या होत्या. या व्यतिरिक्त दुस–या जमीन रामदासच्या नावे होत्या. त्याचा फेरफार मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की मयत रामदास याचा मुंबईत ट्रान्सपोर्टचा व्यवसाय होता. हे म्हणणे खरे आहे की सन १९८० च्या काळात गट नंबर १७० माझ्या नावे खरेदी केला होता. मी स्वतः सांगतो की रामदास मुंबईत असल्याने त्यांने तिथे प्रॉपर्टी घेतल्याने माझ्या नावे काही नसल्याने त्यांने माझ्या नावे जमीन घेतली. हे म्हणणे खरे आहे की रामदास याचा व्यवसाय भरभराटीचा होत असल्याने त्यांने त्याच काळात गट नंबर ८७५ विकत घेतला होता.

**उलटतपास प्रतिवादीच्या विनंती वरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

दिनांक : १७/०१/२०२५

**( एन.एस.सबनीस )**

२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर

पारनेर